निवडणूक आचारसंहिता कालावधीत
पिण्याचे पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत
घेण्यात येणाऱ्या योजनांची अंमलबजावणी

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक ग्रापापु-१००७/प्र.क्र.४/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई- ४० ०३२ दिनांक : १८ जानेवारी २००७**

**वाचा:** १) शासन परिपत्रक, पा.पु.व स्व.वि. क्र.ग्रापापु१००४/प्र.क्र.३५/पापु-०७,
दिनांक १९ मार्च २००४
२) राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्रमांक रानिआ/जिपपंस-२००६/
प्र.क्र.३२/का. ७, दिनांक १५.१.२००७

**परिपत्रक:**

राज्यात लोकसभा, विधानसभा व विधानपरिषद तसेच नगरपालिका, जिल्हा परिषद व ग्रामपंचायतींच्या निवडणूका जाहिर झाल्यानंतर या निवडणूकांसाठी आचारसंहिता लागू होते. या निवडणूक आचारसंहिता कालावधीत पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात संदर्भिय क्रमांक १ येथील दिनांक १९ मार्च २००४ च्या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२. राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर केला असून या निवडणूकींची आचारसंहिता संबधित क्षेत्रामध्ये लागू झाली आहे. या आचारसंहिता कालावधीत पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात क्षेत्रीय यंत्रणांकडून विचारणा होत होती. त्यामुळे संदर्भिय क्रमांक १ येथील परिपत्रकात नमूद केलेल्या सूचनांनुसार पाणी पुरवठा योजनांची कामे करण्यास परवानगी देण्याची विनंती या विभागाने दिनांक ६ जानेवारी २००७ रोजीच्या पत्रान्वये राज्य निवडणूक आयोगास केली होती. त्यास अनुसरुन राज्य निवडणूक आयोगाने त्यांचे संदर्भिय क्रमांक २ येथील दिनांक १५.१.२००७ च्या पत्रान्वये, संदर्भिय क्रमांक १ येथील दिनांक १९ मार्च २००४ च्या परिपत्रकामध्ये दिलेल्या सूचनांनुसार निवडणूक आचारसंहिता कालावधीत पिण्याचे पाणी पुरवठा कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यास परवानगी दिली आहे.

३. संदर्भिय क्रमांक १ येथील दिनांक १९ मार्च २००४ मधील पाणी पुरवठा कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासंदर्भातील सूचना सर्व संबंधितांच्या माहितीसाठी पुन्हा देण्यात येत आहेत.

राज्यामध्ये स्थानिक प्राधिकरण्याच्या निवडणूकीच्या आचारसंहिता कालावधीत पिण्याच्या पाणी पुरवठा योजनांची खालील कामे करता येतील:-

१) बाहय अर्थसहाय्य प्रकल्पाची अंमलबजावणी करता येईल.
२) जागतिक बँक अर्थसहाय्यित जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत निवड झालेल्या गावांना योजनेचा लाभ देता येईल.

३) जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत योजनांच्या अंमलबजावणी करिता ग्रामसभा घेणे, विविध समित्या स्थापन करणे, निवड झालेल्या गावांना अनुदान मंजूर करणे, प्रशिक्षण विविध ज्ञान, कौशल्ये, तंत्र विकसित करणे इत्यादी कामे हाती घेता येतील.
४) नैसर्गिक आपत्ती, टंचाई निवारणार्थ पिण्याच्या पाण्याच्या टंचाई कार्यक्रमांतर्गत ज्या उपाय योजनांची आवश्यकता असेल त्या उपाययोजना घेता येतील.
५) पाणी पुरवठा योजनांची नियमित / सर्वसाधारण स्वरुपाची दुरुस्तीची कामे घेता येतील.
६) निवडणूक आचारसंहिता लागू होण्यापूर्वी मंजूर झालेल्या योजनांची कामे पुढे चालू ठेवता येतील.
७) पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात कार्यक्रम अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेली सर्व कामे, उदा.योजनांना मंजूरी देणे, निविदामागविणे, त्या अंतिम करणे, कामाचे कार्यान्वियन आदेश देणे व साहित्य खरेदी करणे इत्यादी कामे करता येतील.

मात्र वरील कामे करताना खालील बाबींचे पालन करण्यात यावे.

१) पिण्याचे पाणी पुरवठा कामासंबंधात भूमिपूजन करण्यासारखे किंवा समारंभ करण्यासारखे सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करण्यांत येऊ नयेत.
२) अशा कामांना किंवा समारंभांना निवडणूक आचारसंहिता कालावधीत कोणत्याही प्रकारची वर्तमान पत्रातून किंवा इतर कोणत्याही प्रकारे प्रसिध्दी देण्यात येऊ नये.
३) योजनांच्या कामाच्या प्रक्रियेत अशासकीय सदस्यांचा कोणत्याही प्रकारचा सहभाग घेण्यात येऊ नये.
४) आचारसंहिता कालावधीत पाणी पुरवठा कार्यक्रमांची अंमलबजावणी करताना कोणत्याही परिस्थितीत उद्‌घाटन करू नये.

४. स्थानिक प्राधिकरणांच्या निवडणूकीच्या काळात आचारसंहिता लागू झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना जिल्हा परिषदांकडून घेण्यात येणा-या पाणी पुरवठा योजनेच्या कामाच्या संदर्भात सर्व वित्तिय व तदनुषंगाने इतर सर्व अधिकार उपयोगात आणता येतील. अशा निवडणूकीच्या आचारसंहितेचा कालावधी संपल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संपूर्ण कारणासहित सक्षम प्राधिकरणाकडे सादर करणे बंधनकारक राहील.
५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २००७०११८१७१७०७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(संजीव कुमार)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
१) मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव
३) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक.

D:\BACKUP WS07\G.R. Folder 2005\1007-CR-4 GR.doc

४) विभागीय आयुक्त (सर्व)
५) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई.
६) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
७) जिल्हा अधिकारी (सर्व)
८) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (सर्व)
९) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१०) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
११) प्रकल्प व्यवस्थापक, सुधारणा सहाय्यक व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, दुसरा मजला, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
१२) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१३) कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१४) उप अभियंता, पाणी पुरवठा उप विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
१५) मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१६) उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१७) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
१८) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परिक्षा/ लेखा अनुज्ञेयता)
१९) महालेखापाल, महाराष्ट्र-१ नागपूर (लेखा परिक्षा/ लेखा अनुज्ञेयता)
२०) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
२१) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
२२) उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
२३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभगातील सर्व नियंत्रण व कार्यासन अधिकारी.
२४) वित्त विभाग (व्यय-३, अर्थसंकल्प १६)
२५) नियोजन विभाग
२६) संगणक कक्ष
२७) निवडनस्ती (पापु-०७)

D:\BACKUP WS07\G.R. Folder 2005\1007-CR-4 GR.doc